

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्त कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मान्यवर.

## 'विवेकानंद'मध्ये सांख्यिकी मार्गदर्शन कार्यशाळा

**कोल्हापूर** : येथील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय व विवेकानंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय सांख्यिकी मार्गदर्शन कार्यशाळा झाली. संख्याशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. वर्षा शिंदे यांनी प्रो. पी. सी. महालनोबीस यांच्या सरकारच्या विकास कार्यातील योगदानाबद्दल माहिती दिली. प्रभारी प्राचार्य सी. बी. पाटील यांनी, 'विद्यार्थ्यांनी माहिती व त्याचे विश्लेषण याचे महत्त्व ओळखून त्याचा व्यवहारात उपयोग करावा,' असे आवाहन केले. वेदांत कोंडकर यांनी 'प्रशासकीय डेटाच्या क्षमतांचा सार्थक उपयोग' या विषयावर मार्गदर्शन केले. ललिता यांचेही भाषण झाले. पूनम गोडणे हिने सूत्रसंचालन केले. प्रा. अभिलाष पाटील यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्त कार्यशाळा

**जनप्रवास : कोल्हापूर**

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर व संख्याशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २० व राष्ट्रीय सांख्यिकी दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर व संख्याशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २० व राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमात सांख्यिकी विभागातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संख्याशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा वर्षा शिंदे यांनी प्रो. पी सी महालनोबीस यांच्या सरकारच्या विकास कार्यातील योगदानाबद्दल माहिती दिली. तसेच त्यांच्या आदरा प्रित्यर्थ त्यांचा जन्मदिवस २९ जून हा राष्ट्रीय सांख्यिकी दिवस साजरा केला जातो व त्याचा उद्देश काय यावर



प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. सी बी पाटील यांनी विद्यार्थ्यांनी माहिती व त्याचे विश्लेषण याचे महत्त्व ओळखून आपल्या दैनंदिन जीवनापासून व्यवहार उपयोगी कार्यात संख्याशास्त्राचा वापर करावा असे आवाहन केले.

तांत्रिक सत्रात वेदांत कोंडकर, सहाय्यक संचालक, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर यांनी प्रशासकीय डेटाच्या क्षमतांचा सार्थक उपयोग या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रशासकीय डेटाचे महत्त्व, पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती आणि विकास नियोजनासाठी त्याची उपयुक्तता यांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच सौ. ललिता, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी यांनी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS) व त्याअंतर्गत सुरू असलेल्या विविध सर्वेक्षणांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

सूत्रसंचालन पूनम गोडणे हिने केले. आभार प्रा. अभिलाष पाटील यांनी मानले. प्राध्यापक तसेच राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

जनप्रवास दि:30/6/2026

Vivekanand College, Kolhapur (An Empowered Autonomous Institute)
ESTD. JUNE 1964